Brought to you By - LAW PREPARATION

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिमूर्ती गोल्फ क्लब, प्लॉट नंबर ३४, बलोवर विहार सन्नोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा -२०२२

क्रमांक : सीएमए-०४२३/सीआर-०१/२०२३/जाहिरात **जाहिरात क्रमांक : ०२६/२०२३**

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग संवर्गातील **११४** पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **शनिवार, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२३** रोजी **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२२** औरंगाबाद, मुंबई व नागपूर या जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल.

२. पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुख्य परीक्षेचा दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

३. पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील व अशा सुधारित/अतिरिक्त मागणीपत्रांचा तपशील मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

५. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी :-

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
१	अर्ज सादर करण्याचा कालावधी	दिनांक २४ मे, २०२३ रोजी १४.०० ते दिनांक १३ जून, २०२३ रोजी २३:५९
२	ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	दिनांक १३ जून, २०२३ रोजी २३:५९
३	भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक	दिनांक १५ जून, २०२३ रोजी २३:५९
४	चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	दिनांक १६ जून, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये

६. पात्रता :-

६.१ भारतीय नागरिकत्व

६.२ वयोमर्यादा, अर्हता, अनुभव, इत्यादी :-

अ.क्र.	पात्र प्रवर्ग	दिनांक १९ मे, २०२३ रोजी वय			शैक्षणिक अर्हता	अनुभव
		किमान	कमाल			
		अमागास/ मागासवर्गीय	अमागास	मागास वर्गीय		
१	नवीन विधी पदवीधर	२१	२५	३०	(१) विधी शाखेतील पदवी, सदर पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन पदवी प्राप्त केली असली पाहिजे आणि (२) विधी पदवीचे अंतिम वर्ष किंवा विधीमधील पदव्युत्तर पदवीचे अंतिम वर्ष (LL.M.)किमान ५५ % इतक्या गुणांनी दिनांक १९ मे, २०२३ , रोजी किंवा त्यापूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक	--
२	वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता	२१	३५	४०	विधी शाखेतील पदवी	(१) मुंबई उच्च न्यायालय किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील दिनांक १९ मे, २०२३, रोजी वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून किमान ३ वर्षांचा वकिली व्यवसायाचा अनुभव. (२) पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल
३	सेवा कर्मचारी (Ministerial Staff) :- उच्च न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य, उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff)	२१	४५	५०	विधी शाखेतील पदवी	विधी पदवी प्राप्तीनंतर दिनांक १९ मे, २०२३ , पर्यंत किंवा तत्पूर्वी किमान ३ वर्षांची सेवाझालेली असणे आवश्यक आहे.

	सदस्य, मंत्रालयाच्या विधी व न्याय विभागाच्या विधी विभागामध्ये विधी सहायक आणित्यापेक्षा उच्च पदावरकाम करणा-या कर्मचारी वर्गाचे सदस्य, उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकीलांच्या कार्यालयातील सेवाकर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य					

६.३ मराठी भाषेचे ज्ञान :-

६.३.१ सर्व उमेदवारांना मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता व लिहिता येणे आवश्यक असून मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान, त्याचप्रमाणे मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

६.३.२ मुलाखतीच्या वेळी मराठी भाषेच्या ज्ञानाबददल खालील सक्षम प्राधिका-याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

(१)ॲटर्नी किंवा अधिवक्ता - संबंधित जिल्हयाचे **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश**/मुख्य न्यायाधीश.

(२)नवीन विधी पदवीधर- विधी अभ्यासक्रमासाठी (LL.B./LL.M.) नांव नोंदणी केली असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा विद्यापीठ विभागाचे प्राचार्य/ प्रमुख.

(३)उच्च न्यायालय आणि त्यास दुय्यम न्यायालये, मंत्रालय इत्यादी विभागातील कर्मचारी—ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवा आहे, असा विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

(४)विशेष परिस्थितीत निवृत्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्या पुनर्सेवाप्रवेशाद्वारे .

६.३.३ मराठी भाषेविषयीची अर्हता धारण न करणा-या उमेदवारांच्या बाबतीत शासन नियमानुसार सहा महिन्यांच्या आत मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक.

६.४ अनुभवाचा पुरावा :-

मुलाखतीच्या वेळी अनुभवाबाबत खालील सक्षम प्राधिका-याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

(१) वकीलांबाबत - जेथे उमेदवार प्रॅक्टिस करीत असेल त्या जिल्हयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश/मुख्य न्यायाधीश.

(२) सेवा कर्मचाऱ्यांबाबत —ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवा आहे, असा विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

६.५ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक :-

६.५.१ सांविधिक विद्यापीठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे असे समजले जाईल.

६.५.२ जाहिरातीच्या दिनांकास म्हणजे **दिनांक १९ मे, २०२३** , रोजी संपादन केलेली शैक्षणिक व इतर अर्हता तसेच अनुभव पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल.

६.६ प्रमाणपत्राचे विहित नमुने :-

६.६.१ मराठी भाषेच्या ज्ञानाबाबत तसेच अनुभव प्रमाणपत्राचे विहित नमुने आयोगाच्या संकेतस्थळावर DOWNLOADS या सदरामध्ये उपलब्ध आहेत.

६.६.२ आयोगाकडून वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार विहित नमुन्यातच अर्हता/पात्रतेसंदर्भात प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

७. निवड प्रक्रिया :-

७.१ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम, २००८ अथवा त्यानंतर वेळोवेळी शासनाकडून करण्यात आलेल्या सुधारणा तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

७.२ पात्रतेसंदर्भात विहित अर्हता, अनुभव तसेच इत्यादी बाबी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखत अथवा निवडीसाठी पात्र असणार नाही.

७.३ आयोगाने त्या त्या वेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार उमेदवार मुलाखत अथवा निवडीसाठी पात्र असल्यासच त्याचा मुलाखत अथवा निवडीसाठी विचार करण्यात येईल.

८. संवर्ग / पदाबाबत सर्वसाधारण तपशील :-

८.१ सर्वसाधारण :-

८.१.१ वेतनश्रेणी :- (१) रुपये २७,७०० — ४४,७७० अधिक नियमानुसार देय इतर भत्ते. (२) वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

८.२ अंध **व** अल्पदृष्टी उमेदवार सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र नाहीत.

८.३ मा. उच्च न्यायालयाकडून दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना मागासवर्गीय उमेदवारांकरीता अनुज्ञेय असलेले कोणतेही फायदे/सवलती देय नाहीत.

८.४ कर्तव्ये व जबाबदाऱ्या :- प्रस्तुत संवर्ग / पदाच्या कर्तव्य व जबाबदा-या याबाबतचा संक्षिप्त तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९. परीक्षेचे टप्पे -

९.१ प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यात घेण्यात येईल :-

(१) पूर्व परीक्षा - १०० गुण

(२) मुख्य परीक्षा - २०० गुण

(३) मुलाखत - ५० गुण

Brought to you By - LAW PREPARATION

९.२ पूर्व व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा योजना इत्यादी संदर्भातील तपशील आयोगाच्या **https://mpsc.gov.in**या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९.३ पूर्व परीक्षा :-

९.३.१ परीक्षेचे स्वरुप :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी, प्रश्नपत्रिका-एक.

९.३.२ एकूण गुण — **१००**

९.३.३ परीक्षेचे माध्यम- इंग्रजी

९.३.४ पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम :-

(१) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (२) सिविल प्रोसिजर कोड (३) इव्हिडन्स ॲक्ट (४) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट (५) स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट (६) महाराष्ट्र रेन्ट कन्ट्रोल ॲक्ट (७) लिमिटेशन ॲक्ट (८) कॉन्स्टिटयुशन ऑफ इंडिया (९) इंडियन पिनल कोड (१०) लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुडस ॲक्ट ॲन्ड पार्टनरशिप ॲक्ट.

९.३.५ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या उददेशाने घेण्यात येईल. गुणवत्तेनुसार एकूण पदसंख्येच्या साधारणपणे दहा पट उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येतील.

९.३.६ पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.तसेच ते उमेदवारांनाही कळविले जाणार नाहीत.

९.४ मुख्य परीक्षा :-

९.४.१ परीक्षेचे स्वरुप :- पारंपरिक

९.४.२ एकूण गुण. २००

९.४.३ प्रश्नपत्रिका - दोन. प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर

९.४.४ परीक्षेचे माध्यम - मराठी व इंग्रजी

Brought to you By - LAW PREPARATION

९.४.५ मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम :-

(अ) पेपर क्रमांक १ :- (१) सिव्हिल प्रोसिजर कोड (२) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट (३) स्पेसिफिकरिलीफ ॲक्ट (४) लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुड्स ॲक्ट ॲन्डपार्टनरशिप ॲक्ट.

(ब) पेपर क्रमांक २ :- (१) इंडियन पिनल कोड (२) एव्हिडन्स ॲक्ट (३) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (४) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम-१९८९ व नागरी हक्क संरक्षण अधिनियम-१९५५ (५) कायदेविषयक ताज्या घडामोडीबाबत निबंध (अंदाजे ८०० शब्दांचा)

९.५ मुख्य परीक्षेचा निकाल :-

९.५.१ यशस्वी उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदांच्या १:३ या गुणोत्तर प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच १:३ हे गुणोत्तर प्रमाण ठेवण्यासाठी निश्चित केलेले एकसमान अंतिम गुण ज्यांनी मिळविले असतील असे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

९.५.२ मुलाखतीस बोलविण्यासाठी पात्र होण्याकरीता प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणे ही किमान अर्हता राहील.

९.५.३ महाराष्ट्र शासनाने सेवा प्रवेशाच्या प्रयोजनाकरीता मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या उमेदवारांच्या बाबतीत प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ४५ टक्के गुण मिळविणे ही मुलाखतीस बोलविण्याकरीता पात्र होण्यासाठी किमान अर्हता राहील.

९.६ मुलाखत — ५० गुण :- मुलाखतीत ४० % अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच फक्त अंतिम निवडीसाठी विचार केला जाईल.

९.७. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-

९.७.१ अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

९.७.२ सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे " भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out) " हा पर्याय आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

९.७.३ " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " पर्याय सादर करण्यासाठी उमेदवारांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

९.७.४ आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

९.७.५ पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

९.८ अंतिम निवड :-लेखी मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

१०. प्रतीक्षा यादी :-

प्रस्तुत पदाचा अंतिम निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १ वर्ष किंवा पुढील परीक्षेच्याअंतिम निकालाच्या दिनांकापर्यंत यापैकी अगोदर जे घडेल तो पर्यंत प्रतीक्षा यादी कार्यान्वित राहील.

११. खालीलपैकी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही:-

११.१ न्यायिक सेवेतून किंवा शासनाच्या किंवा सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा न्यायिक सेवेतील किंवा शासनाच्या किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील कोणत्याही पदाचा परिविक्षा कालावधी पूर्ण केला नसेल किंवा

११.२ नैतिक अध:पतनाचा समावेश असणा-या गुन्हयांच्या अपराधासाठी सिध्दपराधी ठरविण्यात आले असेल किंवा उच्च न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमचे प्रतिरोधित केले असेल किंवा अपात्र ठरविले असेल अथवा ठरविण्यात आले असेल किंवा

११.३ उमेदवारीकरिता सेवाभरती प्राधिकरणावर कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव टाकला असेल किंवा

११.४ उमेदवारपुरुष असेल व त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी असतील आणि उमेदवार स्त्री असेल तर हयात पत्नी असलेल्या पुरुषाशी स्त्रीने विवाह केला असेल किंवा

११.५ दोनपेक्षा अधिक मुले असतील.

१२. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-

१२.१ नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

११.१.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

१२.१.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा .

१२.१.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

१२.२ प्रस्तुत पदावर नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत राहणार आहे, याबाबतचे रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

१२.३ प्रस्तुत पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला कोणत्याही न्यायालयात किंवा त्या न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयात सेवेत असताना सेवा समाप्ती झाल्यापासून दोन वर्षापर्यंत वकिली व्यवसाय करण्यास प्रतिरोध करण्यात येईल आणि सेवा समाप्त झाल्यापासून अशा न्यायालयांमध्ये दोन वर्षासाठी वकिली व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२.४ प्रस्तुत पदावरील नियुक्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.

Brought to you By - LAW PREPARATION

१३. पूर्व परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-

१३.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-

(एक) खाते निर्माण करणे अथवा आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

(दोन) विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

(तीन) परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

(चार) जिल्हा केंद्र निवड करणे.

१३.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-

(एक) प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

(दोन)खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

अ. क्र.	प्रमाणपत्र/कागदपत्र	फाईल फॉर्मेट	किमान फाईल साईज (KB)	कमाल फाईल साईज (KB)
१	पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा (लागू असेल त्याप्रमाणे)	PDF	५०	५००
२	मागासवर्गीय तसेच दिव्यांगांकरीता देय सवलतीच्या अनुषंगाने अधिवास प्रमाणपत्र	PDF	५०	५००

(तीन) उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

(चार) खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

१३.३ सर्वसाधारण :-

(एक) अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

(दोन) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

(तीन) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(चार) आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१३.४ जिल्हा केंद्र निवड :-

(एक) अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

(दोन) जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

(तीन) एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

(चार) एकदा निवडलेल्या अथवा आयोगाने निश्चित केलेले जिल्हा केंद्र / परीक्षा उपकेंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

(पाच) वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

१३.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-

१३.५.१ परीक्षा शुल्क (रुपये) :

(एक) अमागास - रु. ३९४/-

(दोन) मागासवर्गीय/दिव्यांग - रु. २९४/-

(तीन) उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

(चार) परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

१३.५.२ अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनावर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या संवर्ग / परीक्षांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

१३.५.३ परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) ऑनलाईन पध्दतीने :-

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(दोन) ऑफलाईन पध्दतीने :-चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

१३.५.४ परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

१३.५.५ विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

१४. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत

१४.१ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : दिव्यांग२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या ' **लक्षणीय (Benchmark)दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१**' तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१४.२ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१४.३ लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

१४.४ अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

१४.५ परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

१४.६ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या " **दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना** " चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

१५. प्रवेशप्रमाणपत्र :-

१५.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१५.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१५.३ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

१५.४ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

१५.५ परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१५.६ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

१५.७ नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

१६. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील " **उमेदवारांकरीता माहिती** " विभागातील " **सूचना** " अंतर्गत " **सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या सदराखालील " **परीक्षा योजना** " विभागातील "**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा** " मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

१७. सदर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : १९ मे, २०२३ .

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१)आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्यावेळी मोबाईलफोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.

Brought to you By - LAW PREPARATION